महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, हिंगोली

कार्यालय ईमेल पत्ता: gmchingoli@gmail.com कार्यालय दुरध्वनी क्रं. ०२४५६-२९९२००

जा.क्र.शावैमहिं/आस्थ-१-२/सहाय्यक प्राध्यापक/थेटमुलाखत/जाहिरात/ 2509 /२०२५ दि.23.12.२०२५

## - जाहिरात -(Walk-In-Interview)

विषय:- प्राध्यापक,सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक व वरिष्ठ निवासी, संवर्गातील रिक्त पदे थेट मुलाखतीद्वारे एकत्रित मानधनावर भरणे बाबत . . . .

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र.पदनि-२०२३/प्र.क्र.१८६/२३ वैसेवा-२ दिनांक ०६ मार्च,२०२४.

२. Govt. Resolution No. DSB १२०१/P.K.२७६/२००१/Med serv-३, Mumbai, Dt.१०/०८/२००१.

३. Govt. Resolutin No. Pay-२०१९/P.K.०३/२०१९/Med-२, Mumbai Date ३१/१२/२०२०.

४ The Gazette of India, राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग अधिसूचना दि.१४.०२.२०२२.

५.शा.नि.क्रं.एलईसी-१४२४/प्र.क्रं.२२८/वैसेवा-३,दि.१८.०७.२०२४

उपरोक्त विषयानुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, हिंगोली या संस्थेतील खालील नमुद विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक,वरिष्ठ निवासी हि पदे भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या पदाचे अर्ज स्विकृत करुन पात्र उमेदवारांचे अर्ज मा.आयुक्त,वै.शि.व सं.मुंबई यांच्याकडे नियुक्तीच्या पूढील कार्यवाहीस्तव सादर करण्यात येतील. मुलाखतीची तारीख मा.आयुक्त,वै.शि.व सं.मुंबई यांच्या मान्यतेने स्वतंत्र रित्या कळविण्यात येईल. तसेच सहाय्यक प्राध्यापक ही पदे ३६४ दिवसाकरीता व वरिष्ठ निवासी हे १८० दिवसाकरीता शासनाकडून सरळसेवा भरतीव्दारे किंवा बदलीव्दारे नियमित उमेदवार उपलब्ध होई पर्यंत किंवा संचालनालयातर्फे बंधपत्रीत उमेदवार मिळेपर्यंत या पैकी जे आगोदर घडेल तोपर्यंत निवड मंडळा मार्फत निव्वळ उपरोक्त विहीत कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरुपात प्रचलीत शासन नियमानुसार एकत्रित मानधनावर भरण्याकरीता संस्थेच्या जाहिरात फलकावर प्रसिध्द करण्यात येत आहे. मुलाखत दिनांक ३०/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता व पूढील ३० दिवस दररोज थेट मुलाखतीने भरण्यात येणार आहे. या ३०दिवसात उपलब्ध संबंधीत विभागाची सर्व रिक्त पदे भरल्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही . पात्र उमेदवारांनी अर्ज व आवश्यक त्या कागदपत्रासह थेट मुलाखतीकरीता स्वखर्चाने उपस्थित राहावे. तसेच जे उमेदवार अन्य शासकीय/खाजगी संस्थेत/वैद्यकीय महाविद्यालयात कार्यरत आहेत त्यांनी संबंधित संस्थेकडुन ना-हरकत प्रमाणपत्र व नियुक्ती आदेशाच्या छायांकीत प्रती जोडाव्यात.

या संस्थेतील वरिल नमूद सर्व पदांचा एकत्रित मानधनावर तात्पूरत्या स्वरुपात भरावयाच्या पदांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | विषय | शैक्षणीक अर्हता | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| **प्राध्यापक** | | | |
| १ | औषधशास्त्र | राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकानुसार | १ |
| २ | स्त्रिरोग व प्रसूतीशास्त्र | | १ |
| ३ | सुक्ष्मजिवशास्त्र | | १ |
| ४ | रोगप्रतिबंधक व सामाजिकशास्त्र | | १ |
| ५ | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | | १ |
| ६ | बधिरीकरणशास्त्र | | १ |
| ७ | त्वचारोगशास्त्र विभाग | | १ |
| ८ | मनोविकारशास्त्र | | १ |
| | एकून | | ८ |

| अ.क्र. | विषय | शैक्षणीक अर्हता | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| **सहयोगी प्राध्यापक** | | | |
| १ | जीवरसायनशास्त्र | राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकानुसार | १ |
| २ | औषधशास्त्र | | १ |
| ३ | बधिरीकरणशास्त्र | | १ |
| ४ | औषधवैद्यकशास्त्र | | १ |
| ५ | स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र | | १ |
| ६ | क्ष-किरणशास्त्र | | १ |
| ७ | बालरोगचिकीत्साशास्त्र | | १ |
| ८ | न्यायवैद्यकशास्त्र | | १ |
| ९ | मनोविकृतीशास्त्र | | १ |
| १० | जनऔषधवैद्यकशास्त्र | | १ |
| | | एकुण | १० |

टिप-१. वरिल प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या पदाचे अर्ज स्विकृत करुन पात्र उमेदवारांचे अर्ज मा.आयुक्त,वै.शि.व सं.मुंबई यांच्याकडे नियुक्तीच्या पूढील कार्यवाहीस्तव सादर करण्यात येतील.

०२. मुलाखतीची तारीख मा.आयुक्त,वै.शि.व सं.मुंबई यांच्या मान्यतेने स्वतंत्र रित्या कळविण्यात येईल.

सहाय्यक प्राध्यापक रिक्त पदांचा तपशिल-

| | विभागाचे नाव | रिक्त पदसंख्या | SC १२% | ST ९% | VJ ३% | NT-१ २.५% | NT-२ ३.५% | NT-३ २% | SBC २% | OBC १९% | EWS १०% | OPEN ३७% | SEBC | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शरिररचनाशास्त्र | ०२ | १ | | | १ | | | | | | | | ०२ |
| २ | शरिरक्रियाशास्त्र | ०२ | | | | | १ | | | | | | १ | ०२ |
| ३ | जीवरसायणशास्त्र | ०१ | | | | | | | | | १ | | | ०१ |
| ४ | औषधशास्त्र | ०२ | १ | | | | | | | | | १ | | ०२ |
| ५ | सुक्ष्मजिवशास्◦ | ०१ | | | | | | | | | | | १ | ०१ |
| ६ | न्यायवैद्यकशास्त्र | ०१ | | | | | | | | | | १ | | ०१ |
| ७ | रोगप्रतिबंधक व सामाजिक औषधवैद्यकशास्त्र | ०३ | १ | | | | | | १ | | १ | | | ०३ |
| ८ | औषधवैद्यकशास्त्र | ०१ | | | | | | | | | | | १ | ०१ |
| ९ | त्वचा व गुप्तरोगशास्त्र | ०१ | | | | | | | | | १ | | | ०१ |
| १० | क्षयरोग व उररोगशास्त्र | ०१ | १ | | | | | | | | | | | ०१ |
| ११ | नेत्रशल्यचिकीत्साशास्त्र | ०१ | | | | | | | | | | | १ | ०१ |
| १२ | स्त्रिरोग व प्रसूतीशास्त्र | ०१ | | | | | | | | | १ | | | ०१ |
| | एकुण | १७ | ०४ | ० | ०० | १ | १ | ०० | १ | ०० | ०४ | ०२ | ०४ | १७ |

**वरिष्ठ निवासी** रिक्त पदांचा तपशिल-

| | विभागाचे नाव | रिक्त पदसंख्या | SC १२% | ST ९% | VJ ३% | NT-१ २.५% | NT-२ ३.५% | NT-३ २% | SBC २% | OBC १९% | EWS १०% | OPEN ३७% | SEBC | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शरिररचनाशास्त्र | १ | १ | | | | | | | | | | | १ |
| २ | शरिरक्रियाशास्त्र | ३ | | | १ | १ | | | | १ | | | | ३ |
| ३ | जीवरसायणशास्त्र | ३ | | | | | १ | | | | १ | | १ | ३ |
| ४ | औषधशास्त्र | ३ | १ | | | | | १ | | १ | | | | ३ |
| ५ | शरिरविकृतीशास्त्र | २ | | | | | | | | | १ | | १ | २ |
| ६ | सुक्ष्मजिवशास्° | ३ | १ | | | | | | | २ | | | | ३ |
| ७ | न्यायवैद्यकशास्त्र | २ | १ | | | | | | | | | | १ | २ |
| ८ | रोगप्रतिबंधक व सामाजिक औषधवैद्यकशास्त्र | ३ | १ | | | | | | | १ | १ | | | ३ |
| ९ | बालरोगचिकीत्सा शास्त्र | १ | | | | | | | | १ | | | | १ |
| १० | मनोविकृतीशास्त्र | ० | | | | | | | | | | | | ० |
| ११ | क्षयरोग व उररोगशास्त्र | १ | | | | | १ | | | | | | | १ |
| १२ | शल्यचिकीत्साशास्त्र | १ | | | | | | | | १ | | | | १ |
| १३ | स्त्रिरोग व प्रसूतीशास्त्र | १ | | | | | | | | | १ | | | १ |
| १४ | क्ष-किरणशास्त्र | १ | | | १ | | | | | | | | | १ |
| | **एकुण** | २५ | ५ | ० | २ | १ | २ | १ | ० | ७ | ४ | ० | ३ | २५ |

**(अ) शैक्षणिक व इतर अर्हता :-**

**(१) प्राध्यापक या पदासाठी**

**राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग.नवी दिल्ली यांच्या दि.१४.०२.२०२२ च्या राजपत्रातील मानकानूसार वयोमर्यादा-६९ वर्षापेक्षा जास्त नसावे**

GOVERNMENT MEDICAL COLLEGE ★ HINGOLI ★

**(२) सहयोगी प्राध्यापक या पदासाठी**

**राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग.नवी दिल्ली यांच्या दि.१४.०२.२०२२ च्या राजपत्रातील मानकानूसार वयोमर्यादा-६९ वर्षापेक्षा जास्त नसावे**

**(३) सहाय्यक प्राध्यापक या पदासाठी -**

राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने वेळोवेळी विहीत केलेली अर्हता-

(अ). एमडी/एम.एस./डीएनबी संबंधित विषयातील मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी.

(ब). वरिष्ठ निवासी पदाचा एक वर्षाचा अनुभव.

(क). राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषद यांच्या मानकानुसार शैक्षणिक व अनुभवाची पात्रता पुर्ण करीत असलेले उमेदवार.

(ड.) एम.एम.सी. रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (पदव्युत्तर अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या/झाल्याचे नोंदीसह)

**(इ) वयोमर्यादा (सहाय्यक प्राध्यापक व निवासी वैद्यकीय अधिकारी वर्ग-२या पदासाठी)**

खुल्या प्रवर्गासाठी ४० वर्ष व मागासवर्गीय प्रवर्गासाठी ४५ वर्ष राहील.

**(फ) वरिष्ठ निवासी(सेवा)-४५ वर्षे**

वरिष्ठ निवासी (सेवा) या पदासाठी- संबंधित विषयात मान्यता प्राप्त विद्यापिठाची पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

(इ) वेतनश्रेणी- वरिल सर्व पदांना प्रचलित शासकीय नियमानूसार वेतन/मानधन/विद्यावेतन लागू राहील

**वरिष्ठ निवासी या पदावर निवड झाल्यानंतर उमेदवारांनी अनामत रक्कम रु.९५९०७/- रुपये इतके भरणा करणे आवश्यक राहील.**

**(ब) अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे (व्दिप्रतीत):-**

१. अर्ज योग्य त-हेने खोडतोड न करता परिपुर्ण भरुन पुढील कागदपत्रांच्या/प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छायाप्रतीसह सादर करणे आवश्यक आहे.

२. प्रथम, व्दितीय, तृतीय वर्ष एम.बी.बी.एस. उत्तीर्ण गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्र.

३. पदव्युत्तर परिक्षा उत्तीर्ण गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्र, attempt certificate, जात व जात वैधता प्रमाणपत्र (लागु असल्यास), domicile प्रमाणपत्र, अनुभवाचे प्रमाणपत्र.

४. एम.एम.सी./एम.सी.आय. रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र पदव्युत्तर परिक्षा उत्तीर्ण नोंदीसह.

५. या संस्थेत कार्यरत अध्यापकांनी संपुर्ण कागदपत्रे/प्रमाणपत्रे नव्याने सादर करावे कोणत्याही परिस्थितीत त्यांचे संस्थेत जमा असलेले प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती काढण्यासाठी त्यांना दिले जाणार नाही.

**(क) जाहिरातीमधील मजकुरात बदल करण्याबाबत :-**

या जाहिरातीमधील कोणत्याही मजकुरात उदा.अटी/नियम/शर्ती/पदसंख्या इत्याही मध्ये कोणताही बदल करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांनी राखुन ठेवले आहेत. तसेच एखादे पद भरणे अथवा रिक्त ठेवणे या बाबतचे अंतिम निर्णय/अधिकारही अधिष्ठाता यांना असतील.

**टिप :-**

१. जाहिरातीतील नमुद पदे ही निव्वळ उपरोक्त विहीत नमूद कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरुपात भरण्यात येत आहे.

२. ज्या उमेदवारांना संचालनालयाकडून मध्यवर्ती निवड प्रक्रियेव्दारे या पुर्वी सहाय्यक प्राध्यापक, या पदाकरिता शिफारस/ निवड करण्यात आली आहे असे उमेदवार या मुलाखतीस पात्र राहणार नाही.

३. विहीत नमुन्यातील अर्जासोबत रु.२००/- एवढे शुल्काचा रोखीने भरणा रोखपाल, शावैम, हिंगोली यांच्याकडे जमा करावे.

वरील नमुद केलेल्या पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांनी मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित राहावे. मुलाखत दिनांक **<u>३०.१२.२०२५ रोजी</u>** सकाळी ११.०० वाजता अधिष्ठाता कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, हिंगोली येथे घेण्यात येईल. मुलाखतीसाठी स्वतंत्र पत्र पाठविले जाणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच ज्या उमेदवारांनी या जाहिरातीपूर्वी अर्ज सादर केलेले असतील, त्यांनी सदर जाहिरातीनुसार पुनश्च अर्ज सादर करणे आवश्यक आहे. रिक्त पदांची संख्या कमी अथवा जास्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. करिता सर्व अधिकार अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, हिंगोली यांनी राखुन ठेवले आहेत.

GOVERNMENT MEDICAL COLLEGE ★ HINGOLI ★

अधिष्ठाता
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, हिंगोली**
**Dean**
Government Medical College
Hingoli

प्रति,

१. उपरोक्त संबंधित विषयातील प्राध्यापक व विभागप्रमुख, शा.वै.म., हिंगोली

२. वैद्यकीय अधिक्षक, शा.वै.म. व रु., हिंगोली

३. लघुलेखक कक्ष, यांनी सदर जाहिरात संस्थेच्या संकेतस्थळावर तात्काळ प्रसिध्द करावी.

४. सुचना फलक, अधिष्ठाता कार्यालय, शा.वै.म., हिंगोली

५. विद्यार्थी वसतीगृह, ग्रंथालय, शा.वै.म., हिंगोली

६. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपुर, गोंदिया, यवतमाळ, अकोला, नांदेड, छत्रपती संभाजीनगर, पुणे, मुंबई, कोल्हापुर, सोलापुर, धुळे, मिरज, अंबाजोगाई, लातुर, चंद्रपुर.

<u>प्रतिलीपी :-</u>

१. मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, गो.ते.रुग्णालय संकुल, ९वा मजला, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. मा.आयुक्त (वै.शि.), संचालनालय, वै.शि. व सं., मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

३. मा.संचालक, संचालनालय, वै.शि. व सं., मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.